## ५.१ वनगुन्ह्यामध्ये आकृष्ट होणारी भारतीय दंडसंहिता (आय.पी.सी.)ची कलमे

| अ.क्र. | तपशील | कलम | शिक्षा |
|---|---|---|---|
| १ | एकापेक्षा अधिक व पाचपेक्षा कमी व्यक्तीने संघटीत/ एकत्रित येवून संगनमत करून गुन्हा केल्यास. | ३४ | गुन्ह्याच्या स्वरूपावरून शिक्षा |
| २ | ५ पेक्षा अधिक व्यक्तीने संघटीत/ एकत्रित येवून संगनमत करून गुन्हा केल्यास | १४९ | वरील प्रमाणे |
| ३ | कोणत्याही व्यक्तीस चौकशीसाठी हजर राहणेबाबत दिलेल्या लोकासेवकाच्या आदेश/समन्स/नोटीस चे उलंघन केल्यास | १७४ | १ महिना पर्यंत कैद किंवा रु. ५०० दंड किंवा दोन्हीही |
| ४ | कोणत्याही व्यक्तीस चौकशीसाठी मागविलेले कोणतेही कायदेशीर दस्तऐवज लोकसेवकासमोर हजर न केल्यास | १७५ | १ महिना पर्यंत कैद किंवा रु. ५०० दंड किंवा दोन्हीही |
| ५ | कोणत्याही व्यक्तीस कायद्याने लोकसेवकाला माहिती पुरविणे आवश्यक असून ती न पुरविल्यास | १७६ | १ महिना पर्यंत कैद किंवा रु. ५०० दंड किंवा दोन्हीही |
| ६ | कोणत्याही व्यक्तीने लोकसेवकाचे प्रश्नाला कायदेशीर उत्तर देणे बंधनकारक असूनही नकार दिल्यास | १७९ | ६ महिना पर्यंत कैद किंवा रु. १००० दंड किंवा दोन्हीही |
| ७ | सरकारी नोकरास तो सरकारी काम करत असल्यास हरकत घेणे. | १८६ | ३ महिना पर्यंत कैद किंवा रु. ५०० दंड किंवा दोन्हीही |
| ८ | सरकारी नोकराला मदत देणे भाग असून ती मदत न देणे. | १८७ | १ महिना पर्यंत कैद रु. २०० दंड किंवा दोन्हीही |
| ९ | सरकारी कामकाज करत असतांना हेतु पुरस्सर हल्ला/ दगडफेक करून जखमी करणे. | ३३३ | १० वर्षा पर्यंत कैद किंवा दंड |
| १० | सरकारी नोकरास तो सरकारी काम करत असतांना हरकत घेवून अडथळा निर्माण करणे. | ३५३ | २ वर्षा पर्यंत कैद किंवा दंड किंवा दोन्हीही |
| ११ | जंगम मालमत्तेची चोरी केल्यास | ३७९ | ३ वर्षा पर्यंत कैद किंवा दंड किंवा दोन्हीही |



Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| १२ | चोरीचा माल आहे हे माहीत असून सुद्धा तो विकत घेणे. | ४११ | ३ वर्षा पर्यंत कैद किंवा दंड किंवा दोन्हीही |
| १३ | चोरीचा माल आहे हे माहित असून सुद्धा तो विकत घेवून त्या चोरीचा मालाचा व्यापार करण्याचा गुन्हा करणे. (सराईत गुन्हेगार) | ४१३ | आजीवन कारावास किंवा १० वर्षा पर्यंत कारावास किंवा दंड किंवा दोन्हीही |
| १४ | कोणतीही मालमत्ता नष्ट करणे मालमत्तेचे नुकसान करणे किंवा मालमत्तेची तोडफोड करणे. | ४२७ | २ वर्षा पर्यंत कैद किंवा दंड किंवा दोन्हीही |
| १५ | एखाद्या प्राण्याची हत्या खोडसाळपणाने हेतूपुरस्सरपणे करणे, प्राण्यास विष देऊन त्याची हत्या करणे. | ४२९ | ५ वर्षा पर्यंत कैद किंवा दंड किंवा दोन्हीही |
| १६ | वनास आग लावणे स्फोटक पदार्थ बाळगणे. | ४३५ | ७ वर्षा पर्यंत कैद आणि दंड |
| १७ | अन्यायाची आगळीक करणे अन्यायाच्या आगळीकी बद्दल शिक्षा | ४४१, ४४७ | ३ महिना पर्यंत कैद रु. ५०० दंड किंवा दोन्हीही |
| १८ | ठकबाजी करावयाकरीता बनावट लेख करणे | ४६८ | ७ वर्षा पर्यंत कैद आणि दंड |

## ५.२ फौजदारी प्रक्रिया संहिता (Cr.P.C.) १९७३

**वन गुन्ह्याबाबत कलमांची माहिती**

१) भारतीय वनाधिनियम १९२७ चे कलम ६४ नुसार वन गुन्ह्यातील कोणत्याही आरोपीला अधिपत्राशिवाय अटक करण्याचे अधिकार दिलेले आहेत.

सर्व फौजदारी कायद्यांना नियंत्रित करणारा व कामकाजाची रीत लागू असलेला कायदा म्हणजे क्रिमनल प्रोसीजर कोड (सी आर पी सी) म्हणजेच फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ होय.

२) सीआर. पी. सी. कलम ४(२) नुसार भारतीय वन कायद्यांमध्ये न्यायालयीन कार्यप्रणाली दिली नसल्यामुळे सी.आर.पी.सी. ची कार्यप्रणाली वन अधिकारी वापरू शकतो.

३) सीआर. पी. सी. कलम ४६ (१) नुसार अटक करतांना तसे करणारा पोलीस अधिकारी किंवा अन्य व्यक्ती अटक करायच्या व्यक्तीने उक्तीद्वारे किंवा कृती द्वारे स्वाधीन होण्याची तयारी दर्शविली नाही तर, अशा व्यक्तीच्या शरीरास प्रत्यक्षपणे स्पर्श करील किंवा वेढा घालील.

परंतु जेव्हा एखाद्या महिलेस अटक करावयाची असेल तेव्हा जर प्रतिकूल परिस्थिती दिसून येत नसेल तर अटकेबाबत केलेल्या तोंडी सूचनेवरून तिने स्वाधीन होणे ही अटक असल्याचे गृहीत धरण्यात येईल आणि अन्यतः परिस्थिती वरून अन्य कृती आवश्यक नसेल तर किंवा पोलीस

Scanned by CamScanner